दयानंद शिक्षण संस्था,लातूर

आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

## दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

# मासिक ई-मॅगझीन

MARCH 2026

## महिना : मार्च २०२६

**महाविद्यालयात आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे मासिक ई-मॅगझीन.**














No : 1234567890000000000





# भक्तीच्या सोहळ्यात सेवेचा जागर: दयानंद कला महाविद्यालयाच्या 35 रासेयो स्वयंसेवकांनी जपली सामाजिक बांधिलकी!

लातूर: टाळ-मृदुंगाचा गजर, 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष आणि भक्तिरसात न्हाऊन निघालेली श्री. क्षेत्र खंडापूर नगरी! निमित्त होते पाच प्रमुख संतांच्या ऐतिहासिक पादुका दर्शन सोहळ्याचे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्यासह इतर प्रमुख संतांच्या पालख्यांचे एकत्रित आगमन झाल्याने संपूर्ण परिसर चैतन्याने दुमदुमून गेला होता. या अभूतपूर्व सोहळ्यासाठी पंचक्रोशीसह दूरदूरहून वारकरी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, लाखो भाविकांच्या या गर्दीला शिस्त लावत आणि 'जन सेवा हीच ईश्वर भक्ती' हा मंत्र जपत लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाच्या ३५ विद्यार्थी स्वयंसेवकांनी आपल्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. या सोहळ्याच्या यशस्वी नियोजनात दयानंदच्या या शिलेदारांनी मोलाचे योगदान दिले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल भुरे, प्रा. सिद्धार्थ भालेराव व प्रा. केंद्रे रत्नाकर यांच्या अचूक नियोजनानुसार, २८ फेब्रुवारी व १ मार्च असे सलग दोन दिवस विद्यार्थ्यांनी खंडापूर येथे प्रत्यक्ष सेवाकार्य केले. विद्यार्थ्यांचे योग्य समन्वय व नेतृत्व करत संपूर्ण सोहळ्यातील सेवा अत्यंत प्रभावीपणे पार पाडण्यात आली.

विद्यार्थ्यांनी यावेळी भाविकांना योग्य मार्गदर्शन करणे, दर्शनासाठी शिस्तबद्ध रांगा लावणे आणि कार्यक्रम स्थळी स्वच्छता राखणे अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पेलल्या. विद्यार्थ्यांच्या या संयमी आणि सेवाभावी वृत्तीमुळेच हा सोहळा निर्विघ्नपणे पार पडू शकला. भक्ती, सेवा आणि सामाजिक जाणिवेचा एक सुंदर संगम या निमित्ताने पाहायला मिळाला. खंडापूर ग्रामस्थ आणि सोहळ्याच्या आयोजकांनी दयानंद कला महाविद्यालयाच्या रासेयो (NSS) स्वयंसेवकांच्या कार्याचे विशेष कौतुक करून त्यांना शाबासकीची थाप दिली आहे.



# दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

लातूर: दयानंद शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ आणि मार्गदर्शक आदरणीय श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी साहेब यांचा ७५ वा वाढदिवस दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शिस्त आणि प्रेम यांचा सुंदर समन्वय असलेले श्री. लक्ष्मीरमण लाहोटी साहेब हे संस्थेसाठी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व असून, त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी हे केवळ एक प्रशासक नसून ते दूरदृष्टी असलेले नेतृत्व आहेत. संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवणे आणि केवळ आदेश न देता प्रत्येक कर्मचाऱ्याला शैक्षणिक कार्यात सक्रियपणे सहभागी करून घेणे, ही त्यांची विलक्षण कार्यपद्धती आहे. त्यांच्या अभ्यासू आणि शिस्तप्रिय मार्गदर्शनामुळेच दयानंद शिक्षण संस्थेने यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत केली आहेत.



या विशेष सोहळ्याचे औचित्य साधून ७५ डझन वह्या संकलित करून सामाजिक बांधिलकी जपत त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी श्री. लाहोटी साहेबांसोबत त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. इंदिरा लाहोटी यांचाही गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी लाहोटी परिवारातील सदस्य तथा दयानंद शिक्षण संस्थेचे संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी, त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. संगीता लाहोटी तसेच कु. वेदिका लाहोटी व स्वराज लाहोटी यांची विशेष उपस्थिती होती.

या कार्यक्रमाला दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री लक्ष्मीरमण लाहोटी लाहोटी साहेबांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था यापुढेही उत्तरोत्तर प्रगती करत राहो, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या आणि त्यांना उदंड आयुष्यासाठी ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात आली.

# महिला दिना निमित्त दयानंद कलात विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न.




लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, रोटरी क्लब व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर सोमवार दि. ०९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वा. दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. तर रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी आणि दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन उपप्राचार्य डॉ.दिलीप नागरगोजे यांनी केले होते.

आजच्या आधुनिक युगात विद्यार्थिनींमध्ये फास्ट फूड चे सेवन मोठ्या प्रमाणात सुरू झालेले आहे त्यामुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होत चाललेले आहे. ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आहे त्यांना त्याची जाणीव निर्माण करून या शिबिरामध्ये विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते यांनी केले. या कार्यक्रमात १७७ विद्यार्थ्यीनींची तपासणी करण्यात आली. रो.जकी खान कायमखनी अध्यक्ष रोटरी क्लब लातूर च्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना हिमोग्लोबिन वृध्दीसाठी राजगिरा लाडू वितरित करण्यात आले.

दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राध्यापक प्रा. शेख मोहम्मद हुसेन, प्राध्यापिका श्रेया संजय शिंदे विद्यार्थ्यीनी मिताली सोनकांबळे तसेच इतर विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित राहुन तपासणी केली.

या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. संदिपान जगदाळे, डॉ. सुभाष कदम, डॉ. गोपाल बाहेती, प्रा. जीगाजी बुद्रुके, प्रा.दशरथ ननावरे, डॉ. सुधीर गाडवे उपस्थित होते.

# अटल विद्यार्थी व शिक्षक जिल्हास्तरीय प्रकल्प प्रदर्शन दयानंद कलात संपन्न

लातूर: दिनांक ५ : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, महाराष्ट्र, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड, दयानंद कला महाविद्यालय, लातूर व रोटरी क्लब, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अटल विद्यार्थी व शिक्षक जिल्हास्तरीय प्रकल्प २०२५-२६ चे प्रदर्शनाचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मारुती सलगर होते, या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री संजय पंचगल्ले (सहाय्यक शिक्षण संचालक) यांच्या हस्ते करण्यात आले.

श्री संजय पंचगल्ले यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारावा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नवनिर्मिती करावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमात डॉ. शिवाजी गायकवाड तसेच रोटरी अध्यक्ष श्री जकी खान कायमखानी यांचे मनोगत झाले. अध्यक्षीय मनोगतात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर यांनी जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.

या प्रदर्शनात संपूर्ण जिल्ह्यातून अटल टिंकरींग लॅब असलेल्या 22 शाळा मधून 88 प्रकल्प घेऊन 170 विद्यार्थी तसेच यांना मार्गदर्शन करणारे 66 शिक्षक उपस्थित होते. या प्रदर्शनात चार गटातून प्रथम. व द्वितीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व पारितोषिके वितरित करण्यात आली.

या प्रकल्पाच्या समन्वयक म्हणून अधिव्याख्याता निलोफर पटेल यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली, तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जेष्ठ अधिव्याख्याता डॉ. विजयकुमार सायगुंडे, डॉ.जगन्नाथ कापसे, अधिव्याख्याता श्री घनश्याम पौळ, श्री अनिल जाधव, श्रीमती योगेश्वरी नाडे, श्री सुचित्रा जाधव यांनी प्रयत्न केले.

या प्रसंगी रो. मोहन परदेशी, रो. नरेश कोरे आदी मान्यवर उपस्थित होते. परीक्षक म्हणून डॉ. संदीपान जगदाळे , डॉ. वैशाली पाटील, (दयानंद विज्ञान महाविद्यालय) श्री सचिन पतंगे, (दयानंद कला)प्रा. फावडे बी.बी.(जयक्रांती महाविद्यालय) यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीपान जगदाळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले.



# दयानंद कला महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महिला दिनाचे औचित्य साधून 'दयानंद संवाद मंचाची' स्थापना करण्यात आली.महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष डॉ अंजली जोशी यांच्या संकल्पनेतून आगळावेगळा महिला दिन साजरा करण्यात आला.
कोणत्याही आस्थापनेमध्ये काम करत असताना महिला एकत्र आल्यावर एक खूप मोठी सपोर्ट सिस्टीम उभी राहू शकते. पण बऱ्याच ठिकाणी ती उभी राहताना दिसत नाही. अशावेळी दयानंद कला महाविद्यालयामध्ये एकत्र काम करणाऱ्या विविध पदांवरील 49 महिला कर्मचारी यांनी एकत्र येऊन दयानंद संवाद मंच स्थापन केला. ज्यामध्ये या महिलांनी आपल्या दैनंदिन जीवनातील छोट्या-मोठ्या गोष्टींवर व्यक्त होऊन एकमेकांचे विचार जाणून घेतले. त्यातून परस्परांची सुख-दुःखे आणि स्वभावाची वैशिष्ट्ये समजण्यास मदत झाली. याच पद्धतीने अनेक विषयांवर यापुढेही चर्चा करण्याचे निश्चित करण्यात आले. यातून नकळत मैत्रीचा धागा विणताना सर्वजणींना एकमेकींचा आधार बनता येईल अशी अपेक्षा यावेळी महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा डॉ. अंजली जोशी यांनी व्यक्त केली. याप्रसंगी बोलताना त्यांनी महिलांना स्वतःवर खूप प्रेम करण्याचा विचार दिला. महिलांनी निर्भय होऊन जगावे, स्वतःला प्रेमाने बघावे, आपले आरोग्य चांगले ठेवून जीवनात आनंद निर्माण करावा असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी महिलांना शुभेच्छा देताना सांगितले की, महिलांमध्ये खूप काही साध्य करण्याच्या सुप्त शक्ती असते. त्यांना मुक्त वाव देऊन महिलांनी स्वतःला सिद्ध करावे. महाविद्यालयात काम करणाऱ्या सर्वच महिला या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी होत्या. सर्वांनीच एकमेकींच्या हाताला हात लावून  दिपप्रज्वलन केले.आई, पत्नी, बहीण, जाऊ, नणंद, सासू, वर्किंग वुमन व गृहिणी अशा अनेक भूमिका निभावताना, आयुष्यातील संघर्ष जगतांना आपण एकटे पडलो आहोत, आपलं कोणी ऐकून घेत नाही, कोणाच्याही मनात आपल्याला जागा नाही अशा अनेक विचारांना व्यक्त करण्याची एक हक्काची जागा सर्वांना मिळावी म्हणून या संवाद मंचाची स्थापना करण्यात आली. महिलांनी एकमेकांविषयी  बोलण्यापेक्षा, आपल्यातच सुधारणा कशी घडवून आणता येईल, दुसऱ्यांविषयी बोलण्यापेक्षा एकमेकांशी कसं बोलता येईल,एकमेकींना कसं जाणून घेता येईल,एकमेकींचे प्रश्न कसे सोडवता येतील यावर कृती करणे आवश्यक आहे. असा संदेश या कार्यक्रमातून प्रतीत झाला. महिला  स्वतःवर प्रेम करतात का या प्रश्नावर सर्वच महिला व्यक्त झाल्या.अतिशय सुंदर आणि मार्मिक उत्तरांनी हा कार्यक्रम रंगला होता. कोणी गाण्यातून तर कोणी कवितेतून तर कोणी विचारातून अतिशय प्रामाणिकपणे अभिव्यक्त झाल्या. या निमित्ताने मैत्रिणींना नव्याने ओळखता आले. त्यांच्यातील कितीतरी गोष्टी नव्याने कळाल्या. कोणी छान गात, कोणी छान लिहित, कुणी कविता करतं, तर कोणी स्वयंपाक छान करतं, कोणाला सुंदर राहायला, दिसायला आवडतं, कुणाला साधेपणाने जगायला आवडतं, कोणी दुसऱ्यांच्या टिकांना इग्नोर करतं, तर कोणी मनावर घेऊन फार विचार करतं अशा कितीतरी विचारांच्या, भावनांच्या सुंदर छटा या कार्यक्रमातून उमटल्या! प्रत्येकीने नृत्य आणि खेळाचा आनंद घेऊन पुन्हा बालपण अनुभवलं!

कार्यक्रमाच्या अखेरीस सर्व महिलांचा फुलांचा मुकुट घालून सन्मान करण्यात आला. मैं शक्ती हू,कर सकती हुं या प्रेरणादायी गीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. महाविद्यालयाच्या महिला तक्रार निवारण समितीच्या सदस्य डॉ.दुर्गा शर्मा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर  प्रा. सुवर्णा लवंद यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी महिलांना शुभेच्छा दिल्या.

# दयानंद कला महाविद्यालयात एमपीएससी स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात

लातूर : येथील दयानंद कला महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी "महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा तयारी व करिअर मार्गदर्शन"या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच त्यांना योग्य दिशा देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून गट विकास अधिकारी श्री. शिवकुमार पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांना करिअरचा एक सक्षम व प्रतिष्ठित पर्याय म्हणून स्वीकारून सातत्याने अभ्यास करावा, असे मार्गदर्शन केले. अशा प्रकारचे मार्गदर्शनपर कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करून त्यांच्या आत्मविश्वासात वाढ करतात, असेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख मार्गदर्शक श्री. शिवकुमार पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासाची पद्धत, वेळेचे योग्य नियोजन तसेच आवश्यक संदर्भ ग्रंथ याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सातत्यपूर्ण अभ्यास, संयम ,सकारात्मक दृष्टिकोन आणि शिस्तबद्ध तयारी यांचे महत्त्व पटवून दिले. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही आत्मविश्वास, चिकाटी आणि जिद्द यांच्या बळावर स्पर्धा परीक्षांची तयारी केल्यास निश्चित यश मिळवता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा, ग्रंथालय आणि मार्गदर्शन यांचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्री. देवांश पाचंगे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. नेहा मोरे या विद्यार्थिनीने करून दिला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. गजानन घायाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला प्रा. चैतन्य शिंदे, प्रा. आदित्य शिरोळे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मार्गदर्शन सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. त्यामुळे हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरला.



# आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत दयानंद कला महाविद्यालयात मेहंदी, फेटे बांधणी व साडी परिधान प्रशिक्षण

आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर , रोटरी क्लब लातूर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने येथे मेहंदी काढणे, फेटे बांधणी आणि साडी परिधान करण्याचे विशेष प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व पारंपरिक कौशल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून विविध पारंपरिक कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड हे होते, तर रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.जकीखान कायमखानी यांची प्रमुख उपस्थिती होती. हा उपक्रम दयानंद कला महाविद्यालय व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, आधुनिक काळात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी विविध कौशल्येही आत्मसात करणे आवश्यक आहे. अशा कौशल्यांच्या आधारे विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविकास घडवून आणणाऱ्या उपक्रमांना दयानंद कला महाविद्यालय सातत्याने प्रोत्साहन देत असल्याचे त्यांनी सांगितले.

रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.जकी खान कायमखानी यांनी रोटरी क्लबच्या सात कलमी कार्यक्रमाची माहिती देताना सांगितले की, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, पाणी संवर्धन तसेच रोजगार निर्मिती यांसारख्या क्षेत्रांत रोटरी क्लब समाजोपयोगी उपक्रम राबवत असतो. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविकास आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी अशा कार्यक्रमांना रोटरी क्लबकडून नेहमीच सहकार्य केले जाते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले. त्यांनी आपल्या मनोगतात नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये कौशल्यविकासाला विशेष महत्त्व देण्यात आले असून विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच विविध कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे असल्याचे सांगितले. या शिबिरामध्ये 47 विद्यार्थ्यींनींना मेहंदी काढण्याचे प्रशिक्षण इरफान पठाण यांनी दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना मेहंदी काढण्याच्या विविध पद्धती व डिझाइन्सचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. 57 विद्यार्थ्यांना फेटे बांधणीचे प्रात्यक्षिक प्रा. सूरज साबळे यांनी सादर करून पारंपरिक पद्धतीने फेटा कसा बांधावा याचे प्रशिक्षण दिले. तर 38 विद्यार्थ्यीनींना साडी परिधान करण्याचे मार्गदर्शन प्राध्यापिका प्रिती बीराजदार व मानसी आग्रे मॅडम यांनी विविध शैलींची माहिती दिली.

या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. डॉ. गोपाल बहेती यांच्यासह रो.ॲड विश्वजीत कदम, कवी रो.नागनाथ कलवले, स्टाफ सचिव प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा.दशरथ ननावरे, प्राध्यापीका शांता कोटे,अंजली बनसोडे, प्रा. विलास कोमटवाड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल भुरे, प्रा. सिद्धार्थ भालेराव , श्री. इरफान आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता अकरावीच्या विद्यार्थीनी कु.एकता पुरोहित, कु.जान्हवी काळे तर आभार प्रदर्शन प्रा.दिनेश जोशी यांनी केले.





# दयानंद कला महाविद्यालयात 'पेटंट फिलींग प्रक्रिया, संशोधन आणि त्यातील अडथळे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न




दयानंद कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे आज दिनांक 13 मार्च 2026 रोजी 'पेटंट फिलींग प्रक्रिया, संशोधन आणि त्यातील अडथळे' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील मॅनेजमेंट सायन्सचे विभाग प्रमुख डॉ. बालाजी कळंबे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते.

मानव्यविज्ञान शाखेतील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी पेटंट फिलिंग करण्याकडे लक्ष दिल्यास अवघड काही नाही असे मत डॉ. बालाजी कळंबे यांनी व्यक्त केले. प्राध्यापक आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी व्हिडिओ बनवतात किंवा विशिष्ट पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांना शिकवतात. अशावेळी त्यांनी बनवलेले व्हिडिओ किंवा वापरलेली पॅडागॉजी यावर पेटंट फाईल करता येते.याविषयी अधिक मार्गदर्शन करताना त्यांनी पेटंट फिलींग करण्याचे वेगवेगळे प्रकार सांगितले. त्यात मानव्यविज्ञान शाखेतील प्राध्यापकांशी संबंधित असणाऱ्या डिझायनर पेटंट बाबत विस्तृत माहिती दिली. प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना डॉ. अंजली जोशी यांनी कला महाविद्यालयातील प्राध्यापकांची पेटंट फिलिंग बाबतची उदासीनता व्यक्त केली. प्राध्यापकांना या संदर्भात अधिकाधिक माहिती मिळावी यासाठी 10 पेटंट ज्यांनी मिळवले आहेत अशा डॉ. बालाजी कळंबे यांचे प्रमुख मार्गदर्शन आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी डॉ. संतोष पाटील समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम ए चा विद्यार्थी सुरज गोरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा ज्योती कदम यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ संजय स्वामी यांनी मेहनत घेतली..

या कार्यशाळेत वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

# प्लास्टिकला 'नकार' हाच पर्यावरण संवर्धनाला 'आधार' - उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे

लातूर: येथील दयानंद कला महाविद्यालयातील 'इको क्लब'च्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिक वापर टाळण्यासंदर्भात विशेष मार्गदर्शनपर उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. दिलीप नागरगोजे म्हणाले की, प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण हे पर्यावरण, प्राणी आणि मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. प्लास्टिक हे अविघटनशील असल्याने ते माती आणि पाणी दूषित करते, तर जाळल्यास त्यातून बाहेर पडणाऱ्या विषारी वायूंमुळे हवेचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. सध्या 'मायक्रोप्लास्टिक्स' म्हणजेच प्लास्टिकचे अत्यंत सूक्ष्म कण आपल्या दैनंदिन वापरातील वस्तू, बाटल्या आणि पॅकेजिंगच्या विघटनातून तयार होत असून, ते अन्न, पाणी आणि हवेद्वारे मानवी शरीरात, रक्तात आणि अगदी मेंदूतही प्रवेश करत आहेत. हे कण अन्नसाखळीत शिरून कर्करोग, संप्रेरक असंतुलन आणि श्वसनाचे आजार यांसारखे गंभीर परिणाम घडवून आणत आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्लास्टिक वापराला दिलेला नकार हाच पर्यावरण संवर्धनासाठी मोठा आधार ठरेल, असे विचार त्यांनी मांडले. या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी प्लास्टिक ऐवजी पर्यायी उपाय म्हणून कापडी पिशव्या वापरण्याचा संकल्प केला. तसेच पाणी पिण्यासाठी स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन महाविद्यालयीन परिसर प्लास्टिकमुक्त ठेवण्याची ग्वाही दिली. व्यासपीठावर पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, इको क्लब समितीचे प्रमुख प्रा. सुरेश क्षीरसागर, सदस्य प्रा. सिद्धार्थ भालेराव, इको क्लबचे अध्यक्ष श्री.गजानन वागलगावे, उपाध्यक्षा कु.आरती चाफे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. रत्नाकर केंद्रे, धोंडीराम कोळी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुरेश क्षीरसागर यांनी केले, तर आभार प्रदर्शन इको क्लबचे अध्यक्ष गजानन वागलगावे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.



# दयानंद कला महाविद्यालयाच्या 'विद्यार्थी कल्याण निधी'साठी शिंदे परिवाराकडून 11 हजारांची मदत

लातूर: येथील मराठवाड्यातील अग्रगण्य आणि प्रतिष्ठित दयानंद कला महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक कै. प्रा. सुभाष दादाराव शिंदे यांच्या पाचव्या पुण्यतिथीचे औचित्य साधून शिंदे परिवाराच्या वतीने सामाजिक बांधिलकीचा एक आदर्श नमुना सादर करण्यात आला आहे. महाविद्यालयाचा गौरवशाली वारसा आणि शैक्षणिक शिस्त लक्षात घेता, येथील होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील प्रवासात अल्पशी मदत व्हावी, या उदात्त हेतूने शिंदे परिवाराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण निधी'साठी ११,००० रुपयांचा मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

प्रा. सुभाष शिंदे यांच्या स्मृती जपत असतानाच, समाजाचे देणे लागते या भावनेतून त्यांच्या पत्नी श्रीमती सुधा सुभाष शिंदे, चिरंजीव श्री .हनुमंत सुभाष शिंदे आणि राधिका हनुमंत शिंदे यांनी हे दातृत्व दाखवले आहे. हा मदतीचा धनादेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्याकडे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. दयानंद सारख्या नामांकित संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी पुढाकार घेण्याची शिंदे परिवाराची ही कृती अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. सुनील साळुंखे, डॉ. नितीन डोके, डॉ. बालाजी घुटे, डॉ. रामेश्वर खंदारे, प्रा. दशरथ ननवरे आणि कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी शिंदे परिवाराच्या या दातृत्वाचे कौतुक करून महाविद्यालयाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली.



# दयानंद कला महाविद्यालयात रंगणार 'कलातीर्थ' 2026 वार्षिक स्नेहसंमेलन

लातूर: दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष श्री.ललीतभाई शाह, उपाध्यक्ष श्री. रमेशकुमार राठी, सचिव श्री. रमेश बियाणी, संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी, कोषाध्यक्ष श्री. संजय बोरा यांच्या प्रेरणेतून दयानंद कला महाविद्यालयामध्ये 'कलातीर्थ' वार्षिक स्नेहसंमेलन २४ व २५ मार्च रोजी संपन्न होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या स्नेहसंमेलनात विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २४ मार्च रोजी प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध कवयत्री गुंजन पाटील यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार आहे. तर २५ मार्च रोजी प्रमुख अतिथी श्री. राजन सरवदे (सुप्रसिद्ध लोककलावंत)व श्रीमती माधुरी आवाड (प्रसिद्ध नृत्यांगना, दूरदर्शन कलावंत) यांच्या उपस्थितीत स्नेहसंमेलनाचा समारोप होणार आहे. अशी माहिती दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्नेहसंमेलनाध्यक्ष डॉ. शिवाजी गायकवाड यांनी दिली.

प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व स्नेहसंमेलन प्रभारी डॉ. रमेश पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७ ते २३ मार्च रोजी महाविद्यालयामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पारंपारिक वेशभूषा, रांगोळी, मेहंदी, मूर्ती कला, फॅशन शो, एसएमएस, रील निर्मिती, फोटोग्राफी, पोस्टर प्रेझेंटेशन व न्यूज रिडिंग, वाद-विवाद, निबंध, काव्यवाचन, उस्फुर्त भाषण, वक्तृत्व, अंताक्षरी, स्वयंशासन दिन, आनंदनगरी याबरोबरच बुद्धिबळ, बॅडमिंटन, क्रिकेट या मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभागी होऊन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिके मिळवली.

२४ मार्च रोजीच्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख अतिथी प्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांच्या उपस्थितीत वार्षिक पारितोषिक वितरण होणार असून कार्यक्रमांची सुरुवात त्यांच्या सुप्रसिद्ध कवितांनी होणार आहे. त्यानंतर फोक ऑर्केस्ट्रा, तलवारबाजी, वैयक्तिक गीत, कव्वाली, गोंधळ, देशभक्तीपर नृत्य आणि महाराष्ट्राची लोकधारा इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. तसेच २५ मार्च रोजी श्री. राजन सरवदे व श्रीमती माधुरी आवाड यांच्या उपस्थीतीत कथ्थक, मूक अभिनय, कोळी नृत्य, स्किट, हॉलीवुड मॅशप नृत्य, पोवाडा, पाश्चात्य वैयक्तिक नृत्य, तांडव नृत्य, जलसा, मिमिक्री, हरियानवी ग्रुप, लावणी, पॅटरॉट्रीक डान्स व शेलापागोटे असे विविध कलागुणांचे सादरीकरण विद्यार्थी करणार आहेत.

राष्ट्रीय, राज्य, विद्यापीठ व शालेय बोर्ड स्तरावर प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना दयानंद शिक्षण संस्था, संस्थेचे पदाधिकारी, आजी/माजी प्राचार्य व प्राध्यापक यांच्यावतीने भरीव रोख रक्कम विद्यार्थ्यांना बक्षीस रूपाने दिली जाते. स्नेहसंमेलनाच्या दोन्ही दिवशी प्रमुख अतिथी व संमेलनाध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व विद्यार्थी कल्याण मंडळ प्रमुख, कार्यालयीन अधीक्षक यांच्या हस्ते वितरण केले जाणार आहे. स्नेहसंमेलन कलातीर्थ २०२६ साठी विविध समित्या गठीत केल्या असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कलातीर्थ वार्षिक स्नेहसंमेलन प्रभारी डॉ. रमेश पारवे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, सांस्कृतिक विभागप्रमुख तथा आय क्यु ए सी प्रमुख डॉ. संतोष पाटील, क्रीडा संचालक डॉ. नितेश स्वामी, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख डॉ. शिवकुमार राऊतराव ,स्टाफ सचिव प्रा.सुरेश क्षीरसागर व कार्यालयीन अधीक्षक श्री.संजय व्यास तसेच विविध समित्याचे प्रमुख प्राध्यापक, प्राध्यापिका, कार्यालयीन कर्मचारी व सर्व सेवक स्नेहसंमेलनाचे उत्तम नियोजन करीत आहेत.

# दयानंद कला महाविद्यालय 'कलातीर्थ 2026' चा वार्षिक स्नेहसंमेलनाचा थाटात प्रारंभ "तंत्रज्ञान माहिती देईल, पण अनुभवाचे बोल फक्त शिक्षकच देऊ शकतात – गुंजन पाटील"

लातूर: दयानंद कला महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन 'कलातीर्थ २०२६'चे आयोजन करण्यात आले असून. या संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना गुंजन पाटील यांनी तंत्रज्ञान आणि मानवी अनुभव यातील फरक अधोरेखित केला. त्या म्हणाल्या की, "एक मिनिटाच्या रिल्समध्ये शिक्षण आणि माहिती देणाऱ्या अनेक लिंक येतात. चॅट जीपीटी विचारलेली माहिती नक्कीच देते, पण अनुभवाचे बोल, जगाशी लढण्यासाठी लागणारी ताकद फक्त शिक्षकच देऊ शकतात.  जबाबदारीचा भार कमी करण्याचे काम शिक्षकांमुळे शक्य होऊ शकते." यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनामध्ये संयम ठेवण्याचा सल्ला दिला. सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिप्रेशन, व्यसन आणि आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याने विद्यार्थ्यांनी कॅम्पस मधील प्रत्यक्ष मैत्री टिकवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीमती गुंजन पाटील यांनी आपल्या अनेक कवितांमधून उपस्थितांच्या हृदयाला हात घातला. महाविद्यालयातील प्रेमाची जाणीव करून देताना त्यांनी खालील अनेक कविता सादर केल्या,

या माध्यमातून त्यांनी स्पष्ट केले की, मुलींच्या हातात आज लॅपटॉप आला असला तरी समाजव्यवस्थेने त्यांच्या हातातील पोळपाट आणि लाटणे काढून घेतलेले नाही. "ॲसिड टाकणारा हात पुरुषीच का असतो? आणि स्टोव्हच्या भडक्याने स्त्रीच का जळते?" असे वास्तव वर्णन त्यांनी कवितेतून केले. यावेळी त्यांनी बारावी बोर्ड व विद्यापीठ परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. स्नेहसंमेलनात भारुड, लावणी, छक्कड, सामूहिक नृत्य आणि एकपात्री अभिनय अशा कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. रंगीबेरंगी रोषणाई आणि वाद्यांच्या तालावर विद्यार्थ्यांचा उत्साह अवर्णनीय होता. प्रा. डॉ. अंकुशकुमार चव्हाण व डॉ. सुधीर गाडवे यांनी पारितोषिक वितरणाचे वाचन केले. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, स्नेह संमेलन प्रभारी प्रा. डॉ. रमेश पारवे, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, श्रीमती जयमाला गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. संतोष पाटील, श्री. संजय व्यास यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. जान्हवी काळे व कु. एकता पुरोहित यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. रीशा जवळगेकर हिने मानले.






# दयानंद कला महाविद्यालयात 'कलातीर्थ 2026' वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या जल्लोषात संपन्न

लातूर: दयानंद कला महाविद्यालयात दोन दिवसीय 'कलातीर्थ २०२६'वार्षिक स्नेहसंमेलनाची यशस्वी सांगता प्रसिद्ध लोककलावंत श्री. राजन सरवदे यांच्या लोकसंगीताने व सुप्रसिद्ध नृत्यांगना व दूरदर्शन कलावंत श्रीमती माधुरी आवाड यांच्या दिलबहार नृत्याने झाली. या समारोप कार्यक्रमप्रसंगी ते व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते तर उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कलातीर्थ वार्षिक स्नेहसंमेलन प्रभारी डॉ. रमेश पारवे, आयक्युएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी श्री. राजन सरवदे यांनी असे प्रतिपादित केले की, महाविद्यालयीन तरुणांमध्ये आशेचा किरण दिसत आहे. प्रत्येकाची माणूस होण्यासाठी प्राथमिकता असावी. साहित्य, समाजकारण, प्रेम, कला अशा लोकसंगीताच्या माध्यमातून त्यांनी उपस्थितांची मने जिंकली. श्री. राजन सरवदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते पुढे म्हणाले की, मी स्वतःला भाग्यवान समजतो की मला दयानंद कला महाविद्यालयात शिकायला मिळाले. या महाविद्यालयाने मला एक नवीन ओळख दिली. सामाजिक आस्था काय असते? अशा अनेक गोष्टी मला शिक्षणाबरोबर मिळाल्या या महाविद्यालयातील तरुण-तरुणींनी आपल्या महाविद्यालयाचे नाव लौकिक करण्यासाठी प्रयत्न करावा. ज्या क्षेत्रात जाल तिथे आपली स्वतंत्र ओळख निर्माण करा. आपण असामान्य व्यक्ती आहोत याचा आपल्याला अभिमान वाटेल असे सिद्ध करा.

कवितेमधून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. दयानंद कला महाविद्यालयाचा मानाचा पुरस्कार 'दयानंद श्री'अर्जुन मुरली पवार व 'दयानंद श्रीमती'गायत्री ईश्वर बेडजवळगे यांना गौरविण्यात आले. दोन दिवसापासून सुरू असलेल्या स्नेह संमेलनात महाविद्यालयाच्या परंपरेनूसार सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भारतीय बैठक पध्दतीनूसार सामुहीक सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर विविध कलागुण दर्शनाच्या कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. त्यामध्ये कथ्थक, मूक अभिनय, कोळी नृत्य, स्किट, हॉलीवुड मॅशप नृत्य, पोवाडा, पाश्चात्य वैयक्तिक नृत्य, तांडव नृत्य, जलसा, मिमिक्री, हरियानवी ग्रुप, लावणी, पॅटरॉट्रीक डान्स व शेलापागोटे असे विविध कलागुणांचे सादरीकरण मोठ्या उत्साहात झाले. समारोप कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील वर्ग प्रतिनिधी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमकार सुरवसे व कु. क्रांती वाघमारे यांनी केले. स्नेहसंमेलन यशस्वीतेसाठी २५ समिती प्रमुख, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी मेहनत घेऊन जबाबदारी यशस्वीपणे पार पडली.








# दयानंद कला महाविद्यालयात 22 संशोधक विद्यार्थ्यांची - पीएच.डी. पूर्व मौखिकी

लातूर: दयानंद कला महाविद्यालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी विषयाचे संशोधन केंद्र असून सन 1999 पासून या केंद्रात विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. शै. व. 2025-26 मध्ये एकूण 126 विद्यार्थी संशोधन कार्य करीत आहेत. यामध्ये सुमारे 14 विद्यार्थी महाराष्ट्र आणि केंद्र शासनाच्या विविध योजनेतून अधिवास छात्रवृत्ती दिली जाते. दि. 30.03.2026 रोजी सुमारे 22 विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. पूर्व मौखिकीचे आयोजन करण्यात आले होते. संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधनाचा अंतिम प्रारुप आराखडा सादर केला. यामध्ये इंग्रजी विषयाचे 10, हिंदी विषयाचे 09 आणि मराठी विषयाचे 03 संशोधक विद्यार्थी होते. एकाच दिवशी एवढ्या विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. पूर्व मौखिकीचे आयोजन करणे ही महाराष्ट्रातील एकमेवाद्वितीय घटना आहे. महाविद्यालयातील संशोधन केंद्र अंत्यत प्रगत असून महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सुमारे एक लाख विस हजार ग्रंथ संख्या आहे. या ग्रंथसंख्येचा लाभ नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे संशोधक विद्यार्थी घेत आहेत. 22 विद्यार्थ्यांपैकी तीन अधिवास छात्रवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्व मौखिकी सादर केली. या विद्यार्थ्यांना शासनाकडून संशोधन कार्य पूर्ण होई पर्यंत सुमारे 40,00000/- (अक्षरी रु. चाळीस लाख फक्त) अधिवास शिष्यवृत्ती दिली जाते. महिन्याला सुमारे 37 ते 45 हजार शिष्यवृत्ती दिली जाते.

पीएच.डी. पूर्व मौखिकीच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले तर पूर्व मौखिकीसाठी प्रा. डॉ. अंकुशकुमार चव्हाण यांनी परिश्रम घेतले. तसेच प्रा. राजकुमार मोरे, प्रा. अंगद भुरे आणि अधिवास छात्रवृत्तीधारक श्री. सागर यादव यांनी सहकार्य केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात पूर्व मौखिकीचे आयोजन केल्याबद्दल संशोधन केंद्राचे कौतुक होत आहे.



# मासिक ई-मॅगझीन

## महिना : मार्च २०२६

**संपर्क**
**दयानंद कला महाविद्यालय, लातूर**
**ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org**

**आभार**
**या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक,**
**विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.**